Historicity Research Journal
Volume 1 | Issue 6 | Feb 2015 ISSN:- 2393-8900

Research Article

# क्रांतिविरांगणा विजयाताई लाड — जीवन व कार्य

**विवेकानंद माने**
इतिहास विभाग प्रमुख, क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालय, कुंडल जि. सांगली.

**प्रस्तावना**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात स्वातंत्र्याग्रही, क्रांतिकारक व झुंजार म्हणून ज्या स्त्रियांनी योगदान दिले त्यात सातारा जिल्ह्यातील प्रतिकार चळवळीतील क्रांतिविरांगणा विजयाताई लाड यांचे स्थान व कार्य वैशिष्ट्यपूर्ण आहे. विजयाताई ह्या थोर क्रांतिकारक व सातारा प्रतिसरकारचे फिल्ड मार्शल जी. डी. बापू लाड यांच्या पत्नी होत. सांगली जिल्हा हा क्रांतिकारकांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. क्रांतिसिंह नाना पाटील, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, आप्पाजी लाड, क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी, क्रांतिवीर जी. डी. बापू लाड, हुतात्मा अण्णासाहेब पत्रावळे, बाबूराव चरणकर, वि. स. पागे, क्रांतिवीर बापूजी पाटणकर, नाथाजी लाड, धोंडीराम बापू माळी, गणपतराव कोळी, रावसाहेब कळके, भगवान भोरे व इतर अनेक स्वातंत्र्यसेनांनीनी ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीला जोरदार टक्कर दिली. सांगली जिल्ह्याचे वैशिष्ट्य असे की या स्वातंत्र्यसेनानींच्या घरातील स्त्रियांनीही स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. यामध्ये क्रांतिविरांगणा विजयाताई लाड, क्रांतिविरांगणा हौसाताई पाटील, स्वातंत्र्य सेनानी राजमती बिरनाळे, लक्ष्मीबाई नायकवडी, शलिनीताई मिरगे गंगुबाई लाड, स्त्री मुक्ती चळवळीच्या नेत्या इंदुताई पाटणकर या महिला क्रांतिकारकांचा प्रामुख्याने समावेश होतो.

**जन्म व बालपण :**

क्रांतिविरांगणा विजयाताई लाड यांचे माहेर वाळवे तालुक्यातील येलूर असून तेथील बोगर पाटील घराण्यातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म १९२९ मध्ये झाला. बालपणीच वडिल संभाजीराव बोगर पाटील यांचे निधन झाल्यामुळे त्या त्यांचे मामा बोरगावचे क्रांतिवीर नामदेव बापू पाटील यांचेकडे राहिल्या. लहानपणीचे त्यांचे नाव नवसाताई हे होते. लहानपणीच त्यांना आजोळच्या कुटुंबातून क्रांतिकारक व सत्यशोधक विचारांचे बाळकडू मिळाले होते. त्यामुळे बालपणीच देशासाठी व समाजासाठी आपणास काहीतरी करण्याची संधी मिळावी ही त्यांच्या मनात उर्मी निर्माण झाली. [१]

**क्रांतिकारक विवाह सोहळा :**

त्या काळात लग्नासाठी वर शोधत असताना कुळीढाळी बरोबरच नवऱ्या मुलाचे कुटुंब, बडा जमीनदार आहे का? राहायला वाडा आहे का? यासारख्या निकषाला प्राधान्य दिले जात होते. अशा काळात स्वत:च्या विवाहासंबधी त्यांनी घेतलेला निर्णय आश्चर्यकारक होता. क्रांतिवीर नामदेव बापू व

क्रांतिवीर आप्पासाहेब गुरूजी यांच्यात जी.डी.बापू लाड व नवसाताई यांच्या विवाहासंबंधी चर्चा झाली.[२] क्रांतिवीर आप्पासाहेब गुरूजींनी नवसाताईना प्रश्न विचारला, “ज्याला गावात घर नाही, रानात शीव नाही, ज्याच्या कपाळी संसार नाही किंवा ज्याच्या जीवनात जगण्या—मरण्याची तमा नाही. असा स्वातंत्र्यासाठी प्राणाची बाजी लावायला निघलेला तरूण तुला आवडेल का? मानवेल का? त्याच्या सोबत पडतील ते कष्ट उपसण्याची तुझी तयारी आहे का?” खरे तर अशा प्रश्नांनी एखादी सामान्य मुलगी भांबावून गेली असती. परंतु नवसाताई बोलल्या “मी माझा विचार पहिल्या दृष्टीक्षेपात केला आहे. स्वातंत्र्यासाठी प्राणाची बाजी लावणाऱ्या नरवीर पुरुषाशीच मला संसार करावयाचा आहे. त्यासाठी वाटेल ते कष्ट सोसण्याची माझी तयारी आहे.” [३]

२५ मे १९४५ लग्नाचा दिवस निश्चित झाला.[४] क्रांतिवीर जी.डी. लाडांना पकडण्यासाठी ब्रिटीश सरकारने बक्षिस जाहीर केले होते. तरीही त्यांना चोरून लग्न करणे मान्य नव्हते. आपले लग्न आपल्या सवंगड्यांच्या साथीने झाले पाहिजे असा त्यांचा विचार होता. कुंडलमधील सूर्योपासना मंदिरात रात्री ८.०० च्या सुमारास गांधी पध्दतीने विवाह समारंभ उरकून घेण्याचा निरोप क्रांतिकारकांना पोहोचला.[५] प्रतिसरकारच्या राज्यातील ४५० गावातून हजारो क्रांतिकारक कुंडल येथे उपस्थित झाले. ब्रिटिश सरकारने क्रांतिकारकांना पकडण्याची व्युहरचना केली होती. परंतु त्यावर मात करून रात्री १०.०० वाजता बंदुकांच्या धडाड—धूम आवाजात जी.डी.बापू यांना नवसाताईंनी आपला अंगठा कापून रक्ताचा टिळा लावला. जी.डी.बापूंनीही आपला अंगठा कापून नवासाताईंना रक्ताचा टिळा लावला. या प्रसंगी नवसाताईंचे नाव बदलून विजया असे ठेवण्यात आले.[६] या क्रांतिकारक सोहळ्याचे क्रांतिवीर उत्तमराव पाटील यांनी पौराहित्य केले. क्रांतिवीर आप्पासाहेब लाड, वामनराव घोरपडे, प्रसिद्ध कवी ग. दि. माडगूळकर हे या विवाहाला उपस्थित होते. [७]

**विवाहानंतरचे खडतर जीवन :**

विवाह होताच फिल्ड मार्शल जी. डी. लाड जोडीदार विजयाताईंना घेऊन फरार झाले. तीन महिने फरारी अवस्थेत एकमेकांच्या सोबतीने हे नवपरिणीत जोडपे अज्ञात ठिकाणी फिरत राहिले. त्यानंतर सांगलीत जैन महिलाश्रमात विजयाताई विद्यार्थिनी म्हणून राहिल्या. पण फरारी भूमिगतांच्या जीवनसाथीला अस्थिरतेत रहावे लागते. थोड्याच कालावधीत विजयाताईंना आपली विद्यार्थीदशा आटपावी लागली. त्यानंतर त्या एक वर्ष कोल्हापुरात खोली भाड्याने घेऊन रहात होत्या, त्यांचा हा काळ अज्ञातवासाचा होता. पुढे पुण्यातही त्यांनी असेच सहा महिने काढले. भूमिगत क्रांतिकाराची पत्नी म्हणून पोलिस सतत मागावर असत. परंतु विजयाताई धीट, धाडसी आणि चतुर व बंडखोर होत्या. भूमिगताच्या अंगी अत्यंत आवश्यक असणारी अभिनयाची समयसूचकता त्यांच्याकडे होती. लढ्यातील अनेक धाडसी व थरारक प्रसंगातून त्या अंगच्या चातुर्याने निसटल्या. भूमिगतांचे सहकार्य त्यांना मिळत होते तसेच त्या भूमिगतांना व त्यांच्या कुटुंबियांना सहकार्य देत होत्या.[८] मनोधैर्य देत होत्या. स्वत:ला खंबीर करून इतरांना सावरण्याच्या या काळात विजयाताईंचे आत्मबळ अतुलनीय असे होते.

**सांगलवाडीतील तुफान सेनेच्या शिबिराला मदत :**

सांगलवाडी हे वसंतदादा पाटील यांचे कार्यक्षेत्र होते. परंतु तेथील काही कार्यकर्ते प्रतिसरकारच्या चळवळीकडे आकर्षित होऊन जी.डी.बापूंकडे आले. ऑगस्ट १९४५ मध्ये सांगलवाडी येथे तुफान सेनेचे शिबिर घेण्याचे निश्चित झाले. १५० तरुण त्यामध्ये सहभागी होणार होते, पण पैशाचा प्रश्न निर्माण झाला. जी.डी.बापू चिंताग्रस्त झाले होते. यावेळी विजयाताईंनी क्षणाचाही विचार न करता आपल्या ४ तोळे सोन्याच्या बांगड्या देवू केल्या. शिबिर घेण्यातील आर्थिक अडचण दूर केली.[९]

**क्रांतिविरांगणा लिलाताई पाटील यांच्या सुटकेत सहभाग :**

खानदेशचे क्रांतिवीर डॉ. उत्तमराव पाटील यांच्या पत्नी सौ. लिलाताई पाटील या येरवड्याच्या तुरुंगात होत्या. त्यांना सोडवून आणण्याची योजना क्रांतिवीरांनी आखली. विजयाताई, जी.डी.बापू लाड यांच्याबरोबर या मोहीमेत सामील झाल्या. पूर्वनियोजना प्रमाणे लिलाताई आजारी पडल्या. त्यांना ससून हॉस्पीटल येथे आणण्यात आले. तेथून त्यांना पसार करण्याचा बेत केला होता. सायंकाळी ६ वाजता लिलाताई हॉस्पीटल परिसरात फिरावयास बाहेर पडल्या, दोन पोलीस सोबत होते. जी.डी.बापू व महादेव मिरगे यांनी त्या पोलिसांवर झडप घालून त्यांना खाली पाडले. क्रांतिवीर कळके यांनी लिलाताईना सायकलवर डबलसीट घेतले. सायकल संगम पुलाजवळ आली. तेथे विजयाताई टॅक्सी घेवून हजर होत्या. त्यांना घेवून त्या रास्ता पेठेतील जी. एस. पाटील यांच्या घरी गेल्या. पोलिसांना चुकवून जी.डी.बापू व मिरगे हेही तेथे आले. क्रांतिकारकांचे सहकारी गोविंदराव मिरगे यांची पत्नी शालुकाकी या नुकत्याच बाळंत झाल्या होत्या. त्यांचे १५ दिवसाचे बाळ मांडीवर ठेवून लिलाताईंना बाळंतिणीसारखे नटवण्यात आले. पूणे रेल्वे स्टेशनवरून सदर्न मराठा रेल्वेगाडीने किर्लोस्करवाडीला आणण्यात आले. या प्रवासात पोलिसांच्या तपासणीतून वाचवण्याचे काम विजयाताईनी केले.[१०]

**तुफान सेना दलाचे संचलन :**

तुफान सेना दलाच्या शिस्तबद्ध, धाडसी सैनिकांचे संचलन विजयाताईंच्या देखरेखीखाली होत असे. ऑगस्ट १९४५ मध्ये रेठरे बुद्रुक येथे क्रांतिसिंह नाना पाटील, जी. डी. बापू लाड व विजयाताई यांच्या उपस्थितीत ५००० तुफान सेना दलाचे संचलन सुरू होते. शेकडो स्त्री — पुरूष हे संचलन पाहत होते. ज्यांना कडक शिस्त निभणार नाही त्यांनी पुढे यावे व शिबिर सोडून निघून जावे असे फिल्ड मार्शल जी.डी.बापू लाड म्हणताच पहिल्या रांगेतील ५०—६० जण पुढे आले. यावेळी विजयाताई पुढे झाल्या त्यांनी त्यातील एकाचे हाती स्वत: जवळच्या बांगडया दिल्या व कुंकवाचा करंडा उघडून त्याला कुंकू लावले. हे पाहून पुढे आलेले सर्वजण मागे फिरले, त्यांनी कडक शिस्त निभावण्याचे मान्य केले.[११]

**जी.डी.बापूंच्या कार्यात सहभाग :**

जी.डी.बापूंच्या अनेक प्रसंगात विजयाताई सहकारी म्हणून लढल्या आहेत. विजयाताईंचे काम जी.डी.बापूंच्या कार्याच्या आड लपले आहे. बापूंचे सवंगडी त्यांच्या तापट स्वभावावर नाराज होत असत. त्यांचे रूसवे फुगवे केवळ विजयाताईंच्या मार्गदर्शनाने दूर होत असत. त्या अनेक गावातील सामाजिक कामात हिरिरीने सहभाग घेत असत. वृक्षारोपण, महिला मेळावे, महिला साक्षरता प्रसार, महिला उद्योग, कष्टकरी महिलांचे संघटन अशा कार्यामध्ये भाग घेत असत. जी.डी.बापूंच्या राजकीय जीवनात अनेक चढ उतार झाले, ते कितीही धीराचे असले तरी काही वेळा निराश होत.अशावेळी धीर देण्याचे काम विजयाताईनी केले.[१२] त्यामुळेच जी.डी.बापू लाड आयुष्यभर कष्टकरी—कामकरी, गोरगरीब, पददलित, शेतकरी यांच्या न्यायहक्कासाठी संघर्ष करू शकले. राजकीय व सामाजिक कार्यामुळे जी.डी.बापूंचे महाराष्ट्रभर लोकांशी संबंध जोडले होते. त्यापैकी अनेक जण घरी यायचे. या सर्वांचे कंटाळा न करता आदरातिथ्य करण्याचे काम विजयाताई करत असत.

विजयाताई एक उत्साही, आनंदी आणि जाणते असे व्यक्तित्व होते. प्रतिसरकार चळवळीतील स्त्रियांच्या गाण्याविषयी बोलते केल्यावर त्यांनी पूर्ण म्हणून दाखवले ते गाणे असे [१३]

गोऱ्या सायबांच भ्या कुणी घेईना
आनंद पोटात माझ्या माईना।।

आला बिळाशी घेऊन फौज
आम्ही केली त्याची मौज
त्यांच्या पंज्याखाली गुमान कोणी राहिना ।। १ ।।
गेला वडजात बंदुका ठासून
पाखरावाणी वीर टिपून
त्याच्या धाकाला भीक कुणी घालीना ।। २ ।।
इस्लामपूरात दिली हाक
जमून वाळव्याचा धाक
गोऱ्या सायबाला झोप काही येईना ।। ३ ।।
नाना पाटलाची गर्जना झाली
साताऱ्याची जनता आली
स्वातंत्र्यलढ्याची आग गोरा साहीना ।। ४ ।।

विजयाताईंचा स्वभाव सोशिक होता. १९६७ मध्ये त्यांना हृदयविकाराचा सौम्य झटका येऊन गेला होता. आयुष्याच्या उत्तरार्धात हृदयविकार व मधुमेह हे विकार त्यांना जडले होते. त्यातच १२ ऑक्टोबर २००९ रोजी त्यांचे निधन झाले.

**निष्कर्ष :**

विजयाताईंचे लहानपण क्रांतिकारी विचारांच्या कुटुंबात गेल्यामुळे देशासाठी व समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. जी.डी.बापूंशी विवाह करण्याच्या त्यांच्या निर्णयामुळे त्यांच्या स्वभावातील धीटपणा दिसून येतो. आयुष्य सुरक्षित व सुखाने न जगता कष्टमय जीवनाचे आवाहन त्यांनी स्विकारले. त्यांचा विवाह हा आजही ऐतिहासिक चर्चेचा विषय आहे. विवाहामुळे जी.डी.बापूंचे कार्यकर्ते त्यांचेवर नाराज झाले होते. अशावेळी लिलाताई पाटील यांना येरवडा जेलमधून पळवून आणण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली व क्रांतिकार्यात आपणही सहभागी होवू शकतो हे दाखवून दिले. तुफान सेना दलातील संचलन प्रसंगावरून त्यांच्यातील जिद्द, धीटपणा व बाणेदार वृत्ती या स्वभावांचे दर्शन होते. सांगलवाडीतील शिबिराला केलेल्या मदतीमुळे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांच्या पंक्तीत जावून त्या बसल्या आहेत. स्वातंत्र्योत्तर काळातही त्या बापूंच्या कार्यात सहभागी राहील्या आहेत.

प्रतिसरकारच्या तुफान सेनेतील विजयाताई म्हणजे एक उत्कट जिव्हार होते. आपल्या कार्यकर्तृत्वाने राष्ट्रप्रेमाचे, समाजप्रेमाचे, राष्ट्रसन्मानाचे आणि आत्मसन्मानाचे आदर्श विजयाताईंनी समाजाला घालून दिले आहेत.

**संदर्भ :**

१) कुंभार प्रकाश, लेख 'अहेवं लेणः विजयाकाकू', क्रांतिअग्रणी पर्व (पाक्षिक), कुंडल, ऑक्टोबर २००९, पृ. १३
२) लाड रामचंद्र, लेख 'क्रांतिविरांगणाः सौ विजयाताई लाड', क्रांतिअग्रणी पर्व पाक्षिक, कुंडल ऑक्टोबर २००९ पृ. ५
३) कित्ता, पृ. ६
४) लाड जी. डी.–पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य, क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड समाजप्रबोधन संस्था, कुंडल, २००५, पृ. १५८
५) लाड रामचंद्र, प्रतिसरकारचा रोमहर्षक रणसंग्राम, तुफान प्रकाशन, कुंडल, १९९८, पृ. ८७

६) लाड रामचंद्र, लेख ‘क्रांतिविरांगणा: सौ विजयाताई लाड’, उपरोक्त, पृ. ६
७) कुंभार प्रकाश, लेख ‘अहेवं लेण: विजयाकाकू’, उपरोक्त पृ. १४
८) महाडीक नलिनी, लेख ‘क्रांतिविरांगणा: विजयाताई लाड’, प्रथम स्मृतीदिन विशेष, क्रांतिअग्रणी पर्व पाक्षिक, कुंडल, ऑक्टोबर २०१० पृ. ७
९) कोळेकर वैशाली, महाराष्ट्रातील क्रांतिशलाका, जनसेवा प्रकाशन, वाझर, २०१३ पृ. २४
१०) लाड रामचंद्र, लेख ‘क्रांतिविरांगणा: सौ विजयाताई लाड’, उपरोक्त पृ. ७
११) पाटील व्ही. वाय., संपादकीय लेख, ‘स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रियांचे योगदान, क्रांतिविरांगणा: विजयाताई लाड’, प्रथम स्मृतीदिन विशेष, क्रांतिअग्रणी पर्व पाक्षिक, कुंडल, ऑक्टोबर २०१० पृ. ५
१२) अरुण लाड यांची मुलाखत, दि. २०/११/२०१३
१३) महाडीक नलिनी, लेख ‘क्रांतिविरांगणा: विजयाताई लाड’, उपरोक्त पृ. ८